# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १९/२०१२-१३/ दिनांक :

१) श्री. शशिकांत सदाशिव भोसले,
रा. कडेगांव, ता. पलूस, जि. सांगली. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, किर्लोस्करवाडी, जि. सांगली — विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री शशिकांत सदाशिव भोसले, रा. कडेगांव, ता. पलूस, जि. सांगली यांनी आपले प्रतनिधी श्री. हरिभाऊ दि. खापरे यांचेमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी तासगाव उप विभाग, ग्रामीण विभाग, सांगली यांचेविरुध्द दि. २०.४.२०१२ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहक हे वितरण कंपनीचे ५ अश्वशक्तीचे दि. १५.३.२००८ पासून ग्राहक आहेत. ग्राहकाचा विद्युत पुरवठा शाबू प्रकल्प ग्रुप रोहित्रावरुन होत असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४०८५०२४ असा आहे. हे रोहित्र १०० केव्हीएचे असून ते फारच लोड झालेले आहे. वि.प.च्या धोरणानुसार या ठिकाणी अजून एका १०० केव्हीए रोहित्राची गरज आहे. ग्राहकाच्या वैयक्तिक तक्रारीनुसार हे रोहित्र फारच भारयुक्त असून एल.टी. लाईन फारच लांबलचक पसरली असलेने व्होल्टेज रेग्युलेशनही जास्त आहे. त्यामुळे कमी दाबाने वीज पुरवठा मिळत आहे व लाईन ब्रेकडाऊन होण्याचे प्रमाण जास्त आहे. एक योग्य त्या कपॅसिटीचे रोहित्र करुन मिळावे अशी विनंती केली आहे. यापूर्वी ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.१.२०१२ रोजी तक्रार दाखल केली, त्यामध्ये कक्षाचे आदेश झाले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - एका जादा रोहित्राची उभारणी मंच निश्चित करेल अशा कालावधीत करुन मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.५.२०१२ च्या लेखी अहवालात तक्रारदार ग्राहकाची कमी दाबाने वीज पुरवठा व लाईन ब्रेक डाऊनची तक्रार खोटी व दिशाभूल करणारी आहे. ग्राहकाने शाखा कार्यालय मोहिते वडगांव येथे कोणतीही लेखी तक्रार दिलेली नाही व तक्रार रजिस्टरमध्येही नोंद नाही. ग्राहकाच्या तक्रारीमधील शाबू प्रकल्प ग्रुप कोड नं. ४०८५०२४ व्यवस्थित चालू असून सदर रोहित्रावरील कोणत्याही ग्राहकांची तक्रार नाही. सदर रोहित्र भारयुक्त असून एल.टी. लाईन लांब असून होल्टेज रेग्युलेशन जास्त आहे परंतु सदर सर्कीटचे व्होल्टेज रेग्युलेशन ५.५% एवढे असून ते तांत्रिकदृष्ट्या कमी आहे. दि. ७.५.२०१२ रोजी शाखा कार्यालय मोहिते वडगांवचे दुय्यम अभियंता श्री. तांबोळी यांनी घटनास्थळी ग्राहकांच्या कनेक्शनची पाहणी केली असता, भोसले यांची मोटार व्यवस्थित चालू होती, सदर मोटार वारंवार बंद होत नव्हती. श्री. तांबोळी यांनी सदर मोटारीचा करंट मोजला असता तो ५ एचपी मोटारीचा करंट नियमानुसार सुरुवातीला १० ॲम्पीयर व नंतर ७.५ ॲम्पीयर असतो, परंतु तक्रारदाराच्या मोटारीचा करंट १४.३५, १५.५०, असा आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, तक्रारदार यांच्या मोटारीमध्ये दोष असून सदर मोटर जास्त करंट घेते किंवा सदर मोटारीचे वायडिंग जुने व निकृष्ट दर्जाचे असावे. सदर शाबू प्रकल्प कोड नं. ४०८५०२४ रोहित्रावर भविष्यात येणाऱ्या लोडचा विचार करतां, सदर ठिकाणी एक जादा रोहित्र मंजूर केलेले असून त्याचे काम कंपनीच्या नियमानुसार व जेष्ठतेनुसार करणेत येईल असे म्हटले आहे. तक्रारदाराची कमी दाबाने वीज पुरवठा व लाईन ब्रेकडाऊनची तक्रार खोटी असल्याने सदर तक्रारीबाबत कोणताही दंड लावू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रार मंचासमोर दि. ९.५.२०१२ रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी गैरहजर. वितरण कंपनीचे अधिकारी श्री. बी.पी.व्हनमाने, सहाय्यक अभियंता उपस्थित. त्यांनी ग्राहकाचे कनेक्शनवर जादा करंटचा तिन्ही फेजवर वापर होतो असे सांगितले. इतर कोणत्याही ग्राहकाची व्होल्टेज रेग्युलेशनची तक्रार नाही. श्री. तांबोळी, दुय्यम अभियंता यांनी पहाणी केलेबद्दलचा नवीन अहवाल देण्याचे मान्य केले. त्यानुसार दि. १८.५.२०१२ ला संयुक्त तपासणी अहवाल दाखल केला. त्यामध्ये १०० केव्हीए रोहित्रावर १०५ एचपी लोड आहे असे नमूद केले आहे. या सोबत ग्राहकातर्फे प्राप्त श्री. प्रताप सदाशिव भोसले यांचा मंचाला अग्रेषित केलेला दि. १८.५.२०१२ चा अर्ज जोडला आहे. त्यामध्ये नवीन जादा रोहित्राचे काम येत्या ४ ते ५ महिन्यात पूर्ण करणेची हमी दिल्यामुळे मी दिलेली तक्रार रद्द समजणेत यावी व सदर पत्राद्वारे मी तक्रार माघारी घेत असून नुकसानीबाबत मला कोणतीही भरपाई नको व तक्रारीबाबत कोणासही दंड लावू नये असे म्हटले आहे. अंतर्गत कक्षाचे आदेश दि. २१.५.२०१२ ला हजर केले.

तक्रारदार यांचे बंधू श्री. प्रतास सदाशिव भोसले यांच्या सहीचे हे पत्र असून त्यावर तक्रारदार श्री. शशिकांत सदाशिव भोसले यांची सही नाही. तक्रारदार यांनी त्यांचे बंधू यांना तक्रार मागे घेण्याचे अधिकार दिला आहे काय ? याचा कागदोपत्री पुरावा किंवा तक्रारदाराच्या सहीचे पत्र, प्रतिनिधीचे या बाबतचे म्हणणे घ्यावे असे मंचाचे मत आहे. याबाबत प्रतिनिधींनी संपर्क केला असतां त्यांनी कांही माहिती दिली नाही तसेच सहाय्यक अभियंता, किर्लोस्करवाडी यांनाही दि. ४.६.२०१२ ला दूरध्वनीवरुन सूचना दिल्या असतां, त्यांनी फॅक्स पाठवित आहे असे सांगितले, परंतु तशी माहिती मंचाकडे प्राप्त झाली नाही. दिनांक १६.६.२०१२ ला ग्राहकाचे सहीचे पत्र प्राप्त झाले आहे.

या तक्रारीमध्ये सद्या अस्तित्वात असलेल्या १०० केव्हीएच्या रोहित्रावर १०५ एचपी इतका लोड आहे. संयुक्त तपासणी तक्रारदाराचे भावासमक्ष केली असतां, तक्रारदाराची मोटार चालू असून हे तक्रारदाराला मान्य आहे. वि.प.ने तेथे नवीन रोहित्र मंजूर केले आहे त्याचे काम येत्या ४/५ महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता आहे असे वि.प.ने ग्राहकास आश्वासन दिल्याने तक्रार मागे घेतली आहे. तक्रारीतील एक जादा रोहित्र एका निश्चित कालावधीत मंजूर करावे अशी मागणी आहे. त्यामुळे तक्रारदाराचे गाऱ्हाणे दूर झाले आहे असे मंचाचे मत झाले आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने नवीन रोहित्र मंजूर केले आहे ते ग्राहकास कबूल केल्याप्रमाणे ५ महिन्यात कार्यरत करावा. त्याचे वेगळे आदेश करण्याची आवश्यकता नाही असे मंचाचे मत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com